महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

पर्यावरण विभाग

शासन शुध्दीपत्रक क्र.एमसीझेडएमए २०१७/प्र.क्र.१५८/तां.क.४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक : १२ एप्रिल, २०१८.

वाचा:-

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) शासन समक्रमांकाचा निर्णय दिनांक ३१.०३.२०१८.

शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्गमित शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.३ च्या खाली पुढील परिच्छेद वाचण्यात यावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्र.७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु.क्र.३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील ३ व ९ मधील अटींची पूर्तता होत आहे.

याशिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जूलै, २०१७ अन्वये परिच्छेद क्र.४ मधील खालील बाबींची पूर्तता होत आहे.

१) **महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरण** यांना वितरित करण्यात आलेल्या अनुदानाचा १०० टक्के विनियोग पूर्ण केला असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे.
२) विभागाकडे विभागाच्या ह्या लेखाशिर्षाखाली संक्षिप्त देयकावर घेतलेल्या निधीचे तपशीलवार देयक प्रलंबित नाही.
३) **महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरण** यांनी लगतच्या मागील महिन्याची बँक अकाउंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर केली आहेत. तसेच विभागामार्फत आतापर्यंन्त करण्यात आलेला खर्च ७० टक्के च्या मर्यादेत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०४२३१६५९३८६९०४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manohar Ramchandra Bandpatte

Digitally signed by Manohar Ramchandra Bandpatte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0cfbfeeede9517aa9b96ad1d49625c9c5ad8e7d6dc787d92279da33b569805fb, serialNumber=bb7b9a28cd6d8e2b1fa8f60d210258464e6ece204d02617fbb7ed6be3db6752c, cn=Manohar Ramchandra Bandpatte
Date: 2018.04.23 17:01:42 +05'30'

(मनोहर बंदपट्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) महालेखापाल १ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) निवड नस्ती.

प्रत माहितीसाठी,

१) मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.
३) अपर मुख्य सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.